# निवडणुक प्रचार अभियान डायरी- दि.15.04.2014

**अरुण जेटली**
(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)

**कॉग्रेस पक्षाचे नवे सूत्रः "मै नही मॉम"**

एका आघाडीच्या न्यूज चॅनेलने ट्रॅकर जनमत सर्वेक्षण निकाल दिले. त्यात 275 जागा मिळून संसदेत एनडीए संपूर्ण बहुमत घेऊन आणि भाजपाला 226 जागा मिळतील अशी शक्यता व्यक्त केली आहे. एनडीएला संपूर्ण बहुमत मिळण्याची शक्यता दर्शवणारे हे पहिलेच जनमत सर्वेक्षण आहे. प्रत्येक टप्प्यातल्या मतदानाची तारिख जवळ येत आहे तस-तशी परिस्थिती आणखी स्पष्ट होत आहे. कॉग्रेसविरोधात वाढत असलेला जनाक्रोश आणि नरेंद्र मोदी यांच्याविषयी आशा त्यासाठी कारणीभूत आहे. मी मानतो की, वास्तविक मतदानात नेहमी जनमत सर्वेक्षण जे सांगते त्यापेक्षा अधिक मते मिळण्याची शक्यता असते.

कॉग्रेसच्या जागांमध्ये अधिकाधिक कपात होत असल्याचे वातावरण बनत आहे तस-तसे त्यांची प्रचार अभियान रणनीती बदलत आहे. कॉग्रेसचा प्रचार हा अमूर्त स्वरुपातला आणि संभ्रमावस्थेतला आहे. त्यांचा संदेश स्पष्ट नाही. कॉग्रेस पक्षाने काल ट्रॅक बदलला. राहूल गांधींना आतापर्यंत प्रचार अभियानात आणि जाहिरातीत अग्रस्थान दिल्यानंतर आता अचानक त्यांना मागे करण्यात आले आहे. कॉग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी स्वतःलाच आता पुढे केले आहे. त्यांनी सर्व दूरदर्शन वाहिन्यांवरुन देशाला संबोधण्यास सुरुवात केली आहे.

त्यांच्या आवाजात स्पष्ट निराशा दिसून येते. राजकीय नेत्यांची भाषणे, मुलाखती आणि पत्रकार परिषद नेहमी मिडीयाकडून कवर करण्यात येते. जनतेपर्यंत आपले विचार पोचविण्यासाठी कॉग्रेस अध्यक्षांना टेलीव्हीजन वर चमकण्यासाठी कधीच स्लॉट खरेदी करावा लागला नव्हता. पक्षाच्या सिद्वांतमध्ये फेरफार करण्यात आला. राहूल गांधी यांना पुढे करण्यासाठी प्लॅन काम करत नसल्याने त्यांनी भाषणात फेरफार केला. राहूल गांधी यांच्यात आत्मविश्वासाचा अभाव दिसून येतो. दूरदर्शन वाहिन्यांवरील संदेशात शेवटच्या मिनटात जरी फेरफार करण्यात आला असला तरी निवडणुक जाहिरनामा बदलता येणार नाही. महागाई, अर्थव्यवस्थेची अव्यवस्था, भ्रष्टाचार, पंतप्रधान कार्यालयातील गैरप्रशासन हे भारतीयता आणि हिंदुस्तानीयतचा हिस्सा बनू शकत नाही. सोनिया गांधींचा हा संदेश क्लीक होत नाही. फक्त एकच संदेश त्यांच्या भाषणातून समजतो की कॉग्रेस पक्षाचे नवे सूत्र आता "मी नाही मॉम आहे"